C.N.R.No.MHJG22-000194-2026.

दाखल तारीख : ०५.०३.२०२६

नोंदणी तारीख : ०६.०३.२०२६

निकाल तारीख : ०२.०५.२०२६

कालावधी : ००व.०१म.२६दि.

# दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, चाळीसगांव, जिल्हा जळगाव यांचे न्यायालयात.

(पिठासिन अधिकारी श्री. डी. एस. जाधव)

**हिंदु विवाह याचिका क्रमांक ६०/२०२६.** **निशाणी क्रं.१५.**

**सौ. मयुरी दिपक माळी**
**उर्फ मयुरी अशोक रासण,** .. **अर्जदार क्र.१**
वय – २३ वर्षे, धंदा – घरकाम,
द्वारा – श्री. अशोक मच्छींद्र कासार,
रा. मु. पो. पातोंडा, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.

**आणि**

**श्री. दिपक मधुकर माळी,**
वय – २७ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. मु. पो. पातोंडा, ता. चाळीसगांव, जि.जळगांव. .. **अर्जदार क्र.२**

## हिंदु विवाह अधिनियम १९५५ च्या कलम १३–ब अन्वये.

**अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ तर्फे वकील श्री. निळकंठ पाटील व श्रीमती सोनम चव्हाण.**

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक ०२.०५.२०२६)

दोन्ही अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हिंदु विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३–ब नुसार परस्पर संमतीने विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र.१ व २ यांचे थोडक्यात कथन की, त्यांचा विवाह दिनांक ०४.१०.२०२१ रोजी श्री साई वैदिक विवाह संस्था, अशोक स्तंभ, नाशिक येथे हिंदु धर्मशास्त्र व जाती रिवाजाप्रमाणे झाला होता. ते चार वर्षाहुन अधिक कालावधीपासुन विभक्त राहत आहेत. सदर लग्नसंबंधातुन त्यांना काही एक अपत्य नाही. लग्नानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, त्यांची जीवनशैली, विचारपध्दती, स्वभावभीन्नता व जीवन जगण्याच्या पध्दती भिन्न असल्याने त्यांच्यात वारंवार मतभेद होवून किरकोळ कारणांमुळे त्यांचे पटत नव्हते व वारंवार भांडणतंटा होत असे. सबब, त्यांना या गोष्टीची जाणीव झाली की, त्यांचे एकमेकांसोबत राहणे अशक्य आहे. यापूर्वी त्यांचा संसार जोडण्याकरीता नातेवाईकांनी व मध्यस्थांमार्फत प्रयत्न केले परंतु त्यांना त्यात यश आलेले नाही. सबब, अर्जदार पुन्हा एकत्र येणे शक्य नसल्याने आप–आपसांत संमतीने फारकत घेण्याचे ठरवून त्यांनी प्रस्तुत प्रकरण दाखल केले आहे. सबब, अर्जदारांची पुन्हा एकत्र येण्याची शक्यता नसल्याने विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा पारीत करण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे.

३. निशाणी क्रं.७ वरील आदेशानुसार अर्जदारांकरीता सहा महिन्याचा कालावधी माफ करण्यात आला आहे. अर्जदार क्र.१ व २ यांनी निशाणी क्रं.१२ व १३ अन्वये वेगवेगळे प्रतिज्ञापत्र सादर करुन अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केलेला आहे. अर्जदार क्र.१ व २ यांची पडताळणी शपथेवर घेवून न्यायालयामार्फत विचारणा केली असता त्यांनी एकत्र नांदायचे नाही असे सांगितले. सबब, दोन्ही अर्जदारांवर कोणत्याही प्रकारचा दबाव, दडपण अथवा प्रलोभन नसल्याची खात्री करण्यात आली. दोन्ही अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. मध्यस्थांमार्फत समझोत्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला असल्याचे निशाणी क्र.११ वरील अहवालाप्रमाणे कळविण्यात आले आहे.

४. कागदोपत्री पुराव्याच्या अनुषंगाने अर्जदारांनी लग्नाचा फोटो तसेच ओळखपत्रांच्या पडताळलेल्या प्रती आर्टीकल 'अ' ते 'क' प्रमाणे हजर केलेले आहेत. सबब, अभिलेखावरील दोन्ही अर्जदारांच्या पुराव्यावरुन त्यांच्यामध्ये समेट घडवुन येणे शक्य वाटत नाही. अर्जदार पती पत्नी म्हणुन एकत्र येवून संसार करु इच्छीत नाहीत. सबब, अर्जदारांच्या लग्नानंतर एका वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेला आहे. तसेच ते दिनांक ०५.१०.२०२१ पासुन वेगवेगळे राहत असुन एकत्र येवू शकत नाहीत. सबब, दिनांक ०५.१०.२०२१ नंतर सुध्दा प्रस्तुतचा अर्ज दाखल

करेपर्यंत एक वर्षाचा कालावधी उलटुन गेलेला आहे. अर्जातील परिच्छेद क्रं.३ व ४ मधील नमुद अटींवर त्यांनी आपसी संमतीने विवाह विच्छेदन करण्याचे ठरविले आहे. तसेच तडजोड करण्यासाठीचा सहा महिन्याचा कालावधी निशाणी क्र.७ वरील आदेशाप्रमाणे माफ करण्यात आल्याने हिंदु विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३–ब नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता झाली असल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रकरणातील परिस्थिती विचारात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.क्र.१) मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र.१ नामे **मयुरी दिपक माळी** व अर्जदार क्र.२ **दिपक मधुकर माळी** यांचा दिनांक ०४.१०.२०२१ रोजी झालेला विवाह हिंदु विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३–ब नुसार परस्पर संमतीने प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापासुन अर्जातील परिच्छेद क्रं.३ व ४ मधील अटींनुसार विच्छेदीत झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे. |
| ३. | उपरोक्त आदेशाप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| ४. | दोन्ही पक्षकारांना हिंदु विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम २३(४) नुसार हुकूमनाम्याची प्रत मोफत पुरविण्यात यावी. |
| ५. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात देण्यात व घोषित करण्यात आला. |

DNYANESHWAR SHANKAR JADHAV
Digitally signed by DNYANESHWAR SHANKAR JADHAV
Date: 2026.05.02 15:10:30 +0530

दिनांक – ०२ मे, २०२६.
ठिकाण – चाळीसगांव.

( **श्री. डी. एस. जाधव** )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, चाळीसगांव.